॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ०८ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा आंतरमहाविद्यालयीन युवारंग युवक महोत्सवाला सुरुवात झाली असून विद्यापीठांतर्गत येणाऱ्या ११५ महाविद्यालयांच्या संघांनी नोंदणी केली आहे. यामध्ये ५१३ विद्यार्थी कलावंत तर ८११ विद्यार्थीनी कलावंत यांचा सहभाग असून त्यांना साथ देणारे १७१ असे एकूण १४९५ चा सहभाग आहे त्यांच्यासोबत पुरुष व्यवस्थापक १४३ तर महिला व्यवस्थापक १११ सोबत आहेत.

यंदाचा युवक महोत्सव जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड मॅनेजमेंट (स्वायत्त) येथील प्रांगणात होत असून रंगमंच सज्ज झाले आहेत. युवारंगाची २५ वर्षाच्या गौरवशाली परंपरा कायम ठेवत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग व जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड मॅनेजमेंट (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने हा युवक महोत्सव घेण्यात येत आहे. या युवक महोत्सवात "वंदे मातरम १५०" संकल्पना केंद्रस्थानी ठेवण्यात आली आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीला दिशा देणाऱ्या क्रांतीची ज्वाला पेटविणाऱ्या आणि राष्ट्रभक्तीच्या चेतनेला आकार देणाऱ्या बक्कीमचंद्र चटर्जी यांच्या वंदे मातरम या राष्ट्रगीताला आणि आनंद मठ या कादंबरीला १५० वर्षे पूर्ण होत आहे. या ऐतिहासिक क्षणाचे औचित्य साधत यंदाचा युवक महोत्सव कलात्मक, संस्कृती आणि राष्ट्रभक्तीचा भव्य महासंगम होणार आहे.

या महोत्सवासाठी पाच रंगमंच सज्ज करण्यात आलेले आहेत. त्यात रंगमंच क्र. १ बकिमचंद्र चटोपाध्याय सभागृह, रंगमंच क्रमांक २ स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, रंगमंच क्रमांक ३ कवी प्रदीप सभागृह, रंगमंच क्रमांक ४ कवी प्रेम धवन सभागृह आणि रंगमंच क्रमांक ५ राष्ट्र संत तुकडोजी महाराज सभागृह असून उद्या युवक महोत्सवाच्या उद्घाटनानंतर १ वाजेपासून विविध स्पर्धांना सुरूवात होणार आहे. त्यात मिमिक्री,

**उदघाटन समारंभ :**

दिनांक ९ ऑक्टोंबर रोजी सकाळी ९ वाजून ३० मिनिटांनी राज्याचे जलसंपदा आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री गिरीश महाजन यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष अशोक जैन हे उपस्थित राहतील. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी हे असून उद्योजक महेंद्र रायसोनी व प्र. कुलगुरू प्रा. एस. टी इंगळे यांच्यासह विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व स्वागताध्यक्ष राजेंद्र नन्नवरे, युवारंग चे कार्याध्यक्ष नितीन झाल्टे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, संचालिका डॉ.प्रिती अग्रवाल यांच्या समवेत विविध विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, अधिसभा सदस्य, विद्या परिषद सदस्य व रायसोनी एज्युकेशन चे पदाधिकारी यावेळी उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे व डॉ. संजय शेखावत यांनी दिली

**महोत्सवातील उद्याचे कार्यक्रम :**

| | |
|---|---|
| रंगमंच क्र. १ बकिमचंद्र चटोपाध्याय सभागृह | – नक्कल कलाप्रकार दु. १.०० वाजता |
| | - मुक अभिनय दु. ४.०० वाजता |
| रंगमंच क्रमांक २ स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह | – भारतीय समुहगान दु. १.०० वाजता |
| रंगमंच क्रमांक ३ कवी प्रदीप सभागृह | - वक्तृत्व स्पर्धा दु.१.०० वाजता |
| रंगमंच क्रमांक ४ कवी प्रेम धवन सभागृह | – स्थळचित्र स्पर्धा दु. १.०० वाजता, |
| | - व्यंगचित्र स्पर्धा दु. ४.०० वाजता |
| रंगमंच क्रमांक ५ राष्ट्र संत तुकडोजी महाराज सभागृह | – भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (स्वर वाद्य) दु. १.०० वाजता, |
| | -भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (ताल वाद्य) दु. ४.०० वाजता |

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ८ ऑक्टोबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता